निशाणी क्र. २५

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा शपथेवर जबाब**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांवः–विजय मनोहर रावुळ

वय ५३ वर्षे, धंदाः–पत्रकारीता.

रा.आंबोली, फौजदारवाडी ता–सावंतवाडी , जि. सिंधुदुर्ग.

**सरतपास विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता सौ. डी.व्ही.गोवेकर यांचेतर्फे–**

०१. दि.१६/१२/२०१८ रोजी पोलीसांनी मला नांगरतास येथे बोलावले होते. तेथे एका कारचा व ट्रकचा अपघात झाला होता तेथे पंचनामा करणेकरीता बोलावले होते. मोझे सोबत त्यावेळी आंमरेश गावडे हे होते. पंचनाम्याचे ठिकाण हे नांगरतास मंदिरापासुन १ मीटर अंतरावर बेळगांव रोडवर होते. घटनास्थळी एक ट्रक उभा होता. समोर शेवर लेट पांढ–या रंगाची कार उभी होती. ती कार ट्रकला ड्रायव्हर बाजूने धडकली होती. कारच्या दर्शनी भागाचे नुकसान झाले. कारचे बोनेट ओपन झाले होते. आणि ट्रकच्या समोरील भागाचे नुकसान झाले होते. त्यावेळी पोलीसांनी पंचनामा केला. आता मला सदरचा घटनास्थळ पंचनामा दाखविणेत आला त्यावर माझी.अ.क्र.१ ला सही आहे त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास निशाणी नं.२६ देणेत आले.

सरतपास पुर्ण..

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही.जी.टोपले यांचेतर्फे सुरु..**

हे म्हणणे खरे आहे माझे हॉटेल ते घटनास्थळ यामध्ये सुमारे ८ ते साडे आठ किलो मीटर अंतर आहे. पंचनामा करणेकरीता मला पोलीसांकडून लेखी आदेश मिळाला नाही. हे म्हणणे खरे नाही सदरचा अपघात मला भ्रमणध्वनी वरुन समजला नाही असे घडले नाही. हे म्हणणे खरे आहे माझे हॉटेल पासून घटनास्थळापर्यत जाणेकरीता अर्धा तास वेळ लागतो. मला अपघात घडलेची बातमी भ्रमणध्वनी व्दारे ४ ते साडे चार वाजता समजली. हे मला सांगता येत नाही की, मला फोन आल्यानंतर किती वेळाने पंचनाम्याकरीता बोलावले होते. आंमरीश गावडे याला मी त्याचे हॉटेल शेजारी असल्याने ओळखतो. मला नांगरतास गांवाबद्दल माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे नांगरतास या गांवातील लोकसंख्या साधारण ३०० ते ४०० आहे व तेथे पोलीस पाटील यांची नेमणूक आहे.

मी तरुण भारत या दैनिकाकरीता पत्रकार म्हणून गेली २० ते २२ वर्षे काम करीता आहे. मी पत्रकारीता आंबोली येथे अधिकृत वार्ताहर म्हणून करतो. हे म्हणणे खरे आहे की, मी पत्रकारीता करीता असताना आंबोली दुरक्षेत्रामध्ये जेवढे अपघात झाले त्यातील ब–याच कामामध्ये मी व कोजमा डिसोजा पंच म्हणून काम केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे जेथे हॉटेल आहे त्या परीसरात २०० ते ३०० लोकांची घरे आहेत. नांगरतास व आंबोली या दोन्ही गांवाकरीता एकाच पोलीस पाटील यांची नेमणूक आहे. हे म्हणणे खरे आहे की, आंबोली दुरक्षेत्रामध्ये कोणतीही घटना घडलेस मला पोलीसांमार्फत समजते. हे म्हणणे खरे आहे की, बातमीचे कव्हरेज घेणेकरीता मी पोलीसांची मदत घेतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांशी माझे चांगले संबंध असल्याने पंचनाम्यावर सही केल्याचे मी खोटे सांगत आहे.

हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यातील सर्व मजकूर मी पोलीसांना सांगितला व त्यांनी तो तंतोतंत लिहून घेतला असे घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी मी वाहनाची पाहणी केली असे घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे समक्ष मोजमापे घेतली असे घडले नाही.

हे म्हणणे खरे आहे की, नांगरतास बेळगांव हा रहदारीचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, आंबोली येथे संध्याकाळी ६ नंतर अंधार होणेस सुरुवात होते.

हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांनी तयार केलेल्या पंचनाम्यावर सहया केल्या आहेत व मला घटनास्थळाबद्दल काहीही माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला सर्व मजकूर खोटा सांगितलेला आहे व खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-

दिनांकः- १६/०१ /२०२४

(श्रीमती आर.जी.कुंभार)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
सावंतवाडी.